# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

# प्रसिद्धी निवेदन

**समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा -२०२५**

महाराष्ट्र शासनाच्या **शासन पत्र क्र. संकिर्ण २०२२/प्र.क्र. ८१/टीएनटी १., दि. १५/०९/२०२२ व शासन निर्णय दि. २९/०८/२०२५** अन्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हापरिषद मधील कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी **"समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा -२०२५"** या परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने **दि. ०१/१२/२०२५ ते ०५/१२/२०२५** या कालावधीत आयोजन करण्यात येणार आहे. परीक्षेबाबतचे अधिसूचना, वेळापत्रक व ऑनलाईन आवेदनपत्राबाबतची माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

तरी परीक्षार्थी/उमेदवारांनी वेळोवेळी **www.mscepune.in** या संकेतस्थळावर भेट द्यावी.

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -०४,

**ठिकाण : पुणे**

**दिनांक : २९/०९/२०२५**

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (दूसरा व चौथा मजला) सर्वे नंबर ८३२ ए, फायनल प्लॉट क्रमांक १७८ व १७९, बालचित्रवाणी जवळ, आघारकर रीसर्च इंस्टीट्यूटच्या मागे भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे - ४११००४

Phone No. - ०२०-२९७०९६१७/ २९७०९३९६ Email: bpvmscepune2023@gmail.com Website: www.mscepune.in


जा.क्र.मरापप/बापवि/२०२५/४८८७.

दिनांक: २९/०९/२०२५

## समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा -२०२५

## अधिसूचना

१. महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हा परिषदेमधील कार्यरत प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) व प्रशिक्षित शिक्षक (प्राथमिक) यांची **समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख)** पदावर मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेच्या निवडीव्दारे नियुक्ती देण्यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत माहे डिसेंबर २०२५ मध्ये **समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा -२०२५** चे महाराष्ट्र राज्यातील विविध केंद्रांवर आयोजन करण्यात येत आहे.

**२. प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदांचा व इतर तपशील खालील प्रमाणे आहे.**

**२.१ पदनाम :** - समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख)

**२.२** वेतन श्रेणी :- एस १५: ४१८०० - १३२३००

**२.३** पदसंख्या :- **२४१०**

| अ. क्र. | विभाग | जिल्हा | शासन निर्णय दि. २९/०८/२०२५ नुसार विभागीय स्पर्धा परीक्षेव्दारे पदभरती करिता उपलब्ध पदे दि. २९/०८/२०२५ रोजीची स्थिती | रकाना क्र. ४ मधील पदभरती करीता उपलब्ध पदांपैकी उर्दु माध्यमाची भरावयाची पदे | रकाना क्र. ४ मधील पदभरती करीता उपलब्ध पदांपैकी दिव्यांग व्यक्तीसाठी प्रकारनिहाय भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मुंबई | ठाणे | ५१ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१ |
| २ | | पालघर | ७५ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१ |
| ३ | | रायगड | ११४ | ३ | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०२<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१<br>ड व इ) दिव्यांग प्रकार - ०१ |
| ४ | पुणे | पुणे | १५१ | १ | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०२<br>ब) कर्णबधिरता -०२<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१<br>ड व इ) दिव्यांग प्रकार - ०१ |
| ५ | | सोलापूर | ९९ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१<br>ड व इ) दिव्यांग प्रकार -०१ |
| ६ | | अहिल्यानगर | १२३ | ३ | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०२<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१<br>ड व इ) दिव्यांग प्रकार - ०१ |
| ७ | कोल्हापूर | कोल्हापूर | ८५ | १ | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१<br>ड व इ) दिव्यांग प्रकार - ०१ |



Scanned with OKEN Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | | सांगली | ६८ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१ |
| ९ | | सातारा | १११ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०२<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१<br>ड व इ) दिव्यांग प्रकार - ०१ |
| १० | | सिंधुदुर्ग | ७२ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१ |
| ११ | | रत्नागिरी | १२५ | ८ | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०२<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१<br>ड व इ) दिव्यांग प्रकार - ०१ |
| १२ | अमरावती | अमरावती | ६९ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१ |
| १३ | | यवतमाळ | ८९ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१<br>ड व इ) दिव्यांग प्रकार - ०१ |
| १४ | | वर्धा | ४३ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१ |
| १५ | | अकोला | ४२ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१ |
| १६ | | बुलढाणा | ६५ | ५ | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१ |
| १७ | | वाशिम | ३५ | १ | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१ |
| १८ | नागपूर | नागपूर | ६८ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१ |
| १९ | | गडचिरोली | ५० | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१ |
| २० | | गोंदिया | ४२ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१ |
| २१ | | भंडारा | ३० | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१ |
| २२ | | चंद्रपूर | ६६ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१ |
| २३ | छ. संभाजीनगर | छ. संभाजीनगर | ६४ | ४ | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१ |
| २४ | | परभणी | ४३ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१ |
| २५ | | बीड | ७८ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१<br>ड व इ) दिव्यांग प्रकार - ०१ |
| २६ | | हिंगोली | ३४ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१ |



Scanned with OKEN Scanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २७ | | जालना | ५३ | २ | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१ |
| २८ | नाशिक | नाशिक | १२२ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०२<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१<br>ड व इ) दिव्यांग प्रकार - ०१ |
| २९ | | जळगाव | ८० | ६ | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१<br>ड व इ) दिव्यांग प्रकार - ०१ |
| ३० | | नंदुरबार | ४५ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१ |
| ३१ | | धुळे | ४१ | १ | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१ |
| ३२ | लातूर | लातूर | ५० | २ | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१ |
| ३३ | | धाराशिव | ४० | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१ |
| ३४ | | नांदेड | ८७ | निरंक | अ) अंध/ अल्पदृष्टी - ०१<br>ब) कर्णबधिरता -०१<br>क) अस्थिव्यंगता व इतर - ०१<br>ड व इ) दिव्यांग प्रकार - ०१ |

२.४ उपरोक्त नमुद पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२.५ शासन निर्णय दि. ०१/१२/२०२२ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे त्यांच्या जिल्हयातील उर्दु माध्यमांच्या शाळांची संख्या विचारात घेवून उर्दु माध्यमासाठी **समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख)** ची पदे निश्चित करतांना अंशत: बदल करू शकतात.

**३. शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता:**

**३.१** शासन अधिसूचना दि. १८ जुलै २०२५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेसाठी निश्चित केलेली अर्हता अनिवार्य असेल.

**४. पात्रता :**

**४.१** फक्त संबंधित जिल्हा परिषद मधील शाळेवर कार्यरत पात्र शिक्षक सदर परीक्षेसाठी अर्ज करण्यास पात्र आहेत.संबंधित जिल्हा परिषदे व्यतिरिक्त जसे अन्य जिल्हा परिषद, न.प. / न. पा., म.न.पा., खाजगी संस्था मधील शिक्षक कर्मचारी प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज करण्यास पात्र नाहीत.

**४.२** जाहिरातीस अनुसरून निश्चित करण्यात आलेल्या अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवाराने कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापिठाची बी.ए. / बी.कॉम./ बी.एस.सी. ही पदवी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे आणि जिल्हा परिषदेच्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) किंवा प्रशिक्षित शिक्षक (प्राथमिक) या पदावर किमान सहा वर्षे अखंडीत सेवा पूर्ण करणे आवश्यक आहे. यासाठी शिक्षण सेवक पदावरील सेवा ग्राह्य धरण्यात येईल.

**४.३** दि.०१/०१/२०२५ रोजी अखंड नियमीत सेवेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

**४.४** मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेसाठी उमेदवार ज्या जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असेल, त्याच जिल्हयासाठी निवडीस पात्र राहील.

**४.५** वेळोवेळी निर्गमित शासन निर्णय व मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार पात्रतेत बदल होऊ शकतो. तसेच मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार, वेळोवेळी शासन धोरण व निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पात्र होणे अनिवार्य आहे.



Scanned with OKEN Scanner

**५. आरक्षण संदर्भात सर्वसाधारण तरतूदी:**

**५.१** दिव्यांग आरक्षण:-

**५.१.१** दिव्यांग व्यक्तीची संबंधित संवर्ग / पदांकरीता पात्रता शासनाकडून वेळो वेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**५.१.२** संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकाराचे किमान ४० टक्के दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार/ व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

**५.१.३** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दि. २९ मे २०१९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. अप्रकि - २०१८/प्र.क्र. ४६/आरोग्य-६, दि. १४ सप्टेंबर २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र व UDID कार्ड नंबर सादर करणे अनिवार्य आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रवि२०१७/प्र.क्र.१९६/आरोग्य-६, दि. १३/१०/२०१७ अन्वये दिव्यांग उमेदवारांसंबंधी मार्गदर्शक सूचनेनुसार विहित नमुन्यातील प्रपत्रे परीक्षा केंद्रावरील केंद्रसंचालक किंवा परीक्षा निरीक्षक यांचेकडे देण्यात यावी.

दिव्यांग उमेदवारांनी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन पत्र दिनांक १३/१०/२०१७ मधील तरतुदीनुसार लेखनिक घेणेसाठी त्यांनी ज्या जिल्ह्यातून परीक्षेस प्रविष्ठ झाले त्या जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडून पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. लेखनिक हा इ. १२ वी अथवा १२ वी पेक्षा कमी शिक्षण झालेला असावा.

**५.१.४** शासन निर्णय ग्राम विकास विभाग संकीर्ण - २०२५/प्र.क्र.२४८/आस्था -१४, दि. २८/०८/२०२५ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**५.१.५ लेखनिक व अनुग्रह कालावधी :** सामाजिक न्याय विभाग शासन निर्णय **दिनांक १८/०३/२०१४** अन्वये व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार दिव्यांग उमेदवारांबाबतचा अनुग्रह कालावधी नियमानुसार अनुज्ञेय राहील.

**अ)** दृष्टीहिन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित झालेले विद्यार्थी/उमेदवार लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास परिक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक पुरविणेबाबत अवगत करण्यात आलेले आहे.

**ब)** सक्षम प्रधिकाऱ्याने प्रदान केलेले विहित नमुन्यातील वैद्यकीय प्रमाणपत्र (प्रपत्र-२) परीक्षेचे वेळी सादर करणाऱ्या उमेदवारांनाच अनुग्रह कालावधीची परवानगी देण्यात येईल.

**क)** प्रत्येक तासाला २० मिनिटे याप्रमाणे अतिरिक्त वेळ देण्यात येईल.

**ड)** अनुग्रह कालावधीची मागणी करणाऱ्या उमेदवाराने विहित नमुन्यात (प्रपत्र -४) प्रमाणपत्र परीक्षेच्या वेळी सोबत आणणे तसेच परीक्षा सुरू होण्याच्यापूर्वी समवेक्षक/केंद्रसेचालक यांचेकडे देणे अनिवार्य राहील.

**६. परीक्षा योजना:-**

**६.१** परीक्षेचे टप्पे:- एक - लेखी परीक्षा

**६.२** परीक्षेचे स्वरूप:- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी

**६.३** प्रश्नपत्रिका:- एक

**६.४** एकुण गुण:- २००

| विभाग | घटक | उपघटक | प्रश्न संख्या | गुण |
|---|---|---|---|---|
| 1 | बुध्दिमत्ता व अभियोग्यता | अभियोग्यता- तार्किक क्षमता, वेग आणि अचूकता, भाषिक क्षमता इंग्रजी, भाषिक क्षमता मराठी, अवकाशीय क्षमता, कल, आवड, समायोजन आणि व्यक्तिमत्व इ. बुध्दिमत्ता- आकलन, वर्गीकरणे, समसंबंध, क्रमश्रेणी, तर्क व अनुमान, कूटप्रश्न, सांकेतिक भाषा, लयबध्द मांडणी इ. | 100 | 100 |
| | एकुण ( विभाग 1) | | 100 | 100 |
| 2 | शालेय शिक्षणातील नियम, अधिनियम व शैक्षणिक नवविचार प्रवाह | भारतीय राज्यघटनेतील शिक्षणाविषयक तरतूदी, संबंधित सर्व कायदे, योजना व अद्ययावत शासन निर्णय | 10 | 10 |
| | | शिक्षणाक्षेत्रात काम करणाऱ्या प्रमुख संस्था/संघटन व त्यांचे कार्य | 10 | 10 |
| | | माहिती तंत्रज्ञान वापर (प्रात्यक्षिक) | 15 | 15 |
| | | अभ्यासक्रम व मूल्यमापन, अध्ययन अध्यापन पध्दती | 15 | 15 |
| | | माहितीचे विश्लेषण व मूल्यमापन | 20 | 20 |
| | | विषयनिहाय आशयज्ञान आणि सामान्यज्ञान, विशेष करुन इंग्रजी विषयज्ञान | 15 | 15 |
| | | संप्रेषण कौशल्य (समाज संपर्क साधने) | 15 | 15 |
| | एकूण (विभाग 2) | | 100 | 100 |
| एकूण (विभाग 1 व 2 ) | | | 200 | 200 |

**अनुक्रमांक 2 मधील उपघटकांचे स्वरुप:-**

**उपघटक 1 :** भारतीय राज्यघटनेतील शिक्षण विषयक तरतूदी, बालकांशी संबंधित सर्व कायदे, योजना व अद्ययावत शासन निर्णय-

अ) भारतीय राज्यघटनेतील शिक्षण विषयक तरतूदींची (कलमांची) माहिती (अद्ययावत दुरुस्त्यांसह)

ब) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009 व सदर अधिनियमातील महाराष्ट्र राज्य नियमावली, 2011 (अद्ययावत दुरुस्त्यांसह) विश्लेषण, बलस्थाने व अडचणी.

क) बाल हक्क संरक्षण कायदा, 2005 - बाल संरक्षण आणि सुरक्षा, भय आणि चिंता.

ड) विद्यार्थी लाभाच्या विविध योजना (केंद्र व राज्य शासन) व शिष्यवृत्ती.

इ) विशेष गरजा असणाऱ्या व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी विविध योजना.

**उपघटक 2 : शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या प्रमुख संस्था/संघटन व त्यांचे कार्य**

UNICEF, NCERT, NUEPA, NCTE, CCRT, TISS, TIFR, Homi Bhabha Center of Science Education, RTE, EFLU, MPSP, SCERT, MIEPA, SISI, DIET, राज्य आंग्लभाषा इ.

**उपघटक 3 : माहिती तंत्रज्ञानाचा वापर (प्रात्यक्षिक)**

अ) इंटरनेटचा प्रभावी वापर

ब) शाळास्तरावर विविध माहिती भरणे

क) शासनाच्या उपलब्ध Portal वरील माहिती वापरासंबंधीचे ज्ञान (SARAL, U-DISE +)

ड) संगणक वापराविषयीचे ज्ञान

इ) माहितीचे विश्लेषन

फ) शाळास्तरावरील अंदाजपत्रक व हिशोब

**उपघटक 4 :अभ्यासक्रम व मूल्यमापन, अध्ययन-अध्यापन पध्दती**

अ) पूर्व प्राथमिक ते बारावी पर्यंतचा अभ्यासक्रम

ब) अध्ययन निष्पत्तीतील उणीवा

क) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन व पूरक मार्गदर्शन

ड) प्रश्न निर्मिती (स्वाध्याय) कौशल्य :ASER, NAS, PISA

इ) प्रगत अध्ययन-अध्यापन शास्त्र

फ) निकालासंबंधीची कामे



Scanned with OKEN Scanner

**उपघटक 5 : माहितीचे विश्लेषण मूल्यमापन**

अ) प्राप्त माहितीचे विश्लेषण

ब) शासनाच्या विविध पोर्टलवरील माहितीचे विश्लेषण करता येणे

क) ASER, NAS, PSM चाचण्या, शाळांचे निकाल या माहितीचे विश्लेषण करता येणे.

ड) संप्रेषण कौशल्य : समाज संपर्काची विविध साधने

**उपघटक 6 : विषयनिहाय आशयज्ञान आणि सामान्यज्ञान, इंग्रजी विषयाचे आशयज्ञान**

अ) मराठी, गणित, विज्ञान, इंग्रजी, भूगोल, इतिहास माध्यमिक स्तरापर्यंत विषयांचे ज्ञान

ब) चालू घडामोडी विशेषत: शैक्षणिक बाबी

क) क्रीडा विषयक घडामोडी.

**७. निवड प्रक्रिया :-**

**७.१** लेखी परीक्षेतील एकूण गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड करण्यात येईल.

**७.२** जाहिरातीमध्ये नमूद अर्हता / पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

**७.३** भरती प्रक्रियेदरम्यान अंतिम शिफारस यादी / निवड यादी तयार करतांना समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांचे क्रमांकन / प्राधान्य क्रमवारी सा.प्र.वि. शासन निर्णय दि. ०५/१०/२०१५, शासन पूरकपत्र दि. ०२/१२/२०१७ तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार निश्चित करण्यात येईल.

**८. परीक्षेसाठी अर्ज करण्याची पध्दत:-**

**८.१** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत पुरविण्यात आलेल्या https://www.mscepune.in या लिंकव्दारे दि. **०१ जानेवारी २०२५** रोजी विहित अर्हता धारण करणारे उमेदवार विहित पध्दतीने नोंदणी करून आपला ऑनलाईन अर्ज सादर करू शकतात.

**८.२ शासन निर्णय दि. २९.०८.२०२५ अन्वये** केंद्रप्रमुख मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेचे नाव **समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा -२०२५** असे संबोधण्यात येत आहे. या पूर्वी सन २०२३ मध्ये केंद्रप्रमुख या पदासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. तथापि काही कारणास्तव ही परीक्षा होऊ शकली नाही. त्यामुळे त्यापरीक्षेसाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केला असेल, त्यांना आता या परीक्षेसाठी नव्याने अर्ज करण्याची आवश्यता नाही. तथापि अशा उमेदवारांनी शासन अधिसूचना दि. १८/०७/२०२५ नुसार पात्रता मध्ये झालेल्या सुधारणेरूप सुधारीत अर्हतेची नोंद करणे आवश्यक राहील. या उमेदवारांसाठी अर्हता इ. बाबतीत स्वप्रमाणीकरणाच्या नोंदी सुधारीत करण्यासाठीची सुविधा या परीक्षेच्या ऑनलाईन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत उपलब्ध राहील, याची यापूर्वी ऑनलाईन अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**८.३** या पूर्वी सन २०२३ मध्ये केंद्रप्रमुख या पदासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर परीक्षेसाठी ज्यांनी ऑफलाईन पद्धतीने ई-मेल वर अर्ज/माहिती सादर केलेली आहे, त्यांनी देखील विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील. तसेच आवेदनपत्रामधील समाविष्ट केलेल्या सुधारीत मुद्यांची माहिती भरणे आवश्यक राहील.
(संबंधित उमेदवारांचे यापूर्वी परीक्षेचे शुल्क जमा केलेले आहे. त्यांना सदर शुल्काचा परतावा करण्यात येईल.)

**८.४** परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे आवश्यक आहे.

**८.५** ऑनलाईन अर्ज सादर करतांना खालील कागदपत्रे अपलोड करावी लागतील.

**(अ) पासपोर्ट साईज फोटो** - उमेदवाराने त्याचा स्कॅन केलेला नवीनतम पासपोर्ट साईज (4.5 **सेमी** X 3.5 **सेमी**) फोटो अपलोड करणे आवश्यक आहे.

**आकारमान** - 200 X 300 pixels

**फाईल साईज** - 20 kb - 50 kb

(ब) **स्वाक्षरी** - उमेदवाराने त्याची पांढऱ्या कागदावर काळया शाईने स्वाक्षरी करून स्कॅन केलेली स्वाक्षरी अपलोड करणे आवश्यक आहे.

**आकारमान** - 140 X 60 pixels

**फाईल साईज** - 10kb - 20 kb

(क) **डाव्या हाताच्या अंगठयाची निशाणी** - उमेदवाराने त्याच्या डाव्या हाताच्या अंगठयाची निशाणी (३ सेमी X ३ सेमी पांढऱ्या कागदावर काळया/निळया शाई मध्ये) स्कॅन केलेली प्रतिमा अपलोड करणे आवश्यक आहे. ज्या उमेदवाराला डाव्या हाताचा अंगठा नसेल अशा उमेदवारांनी उजव्या हाताच्या अंगठयाची निशाणी वापरावी.

**आकारमान** - 240 X 240 pixels in 200 DPI

**फाईल साईज** - 20 kb - 50 kb

(ड) शासन अधिसूचना दि. 18/07/2025 मुद्दा क्र. 4 (1) अन्वये केद्रप्रमुख पदापवर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 मधील तरतुदींनुसार किंवा त्याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले अन्य नियम, आदेश किंवा इतर संसाधनानुसार नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहील.

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना अ**

**स्व-हस्ताक्षरातील प्रतिज्ञापत्राचा नमूना**

**नमुना अ**

**(नियम ४ पहा)**

मी,श्री/श्रीम./कुमारी-----------------------------------------------------------------------------------------

मी, श्री.------------------------------------------- यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी वय------------वर्षे

राहणार-----------------------------------------------------------------------------------------------याद्वारे

पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१. आज रोजी मला---------------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या---------------आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा). जन्म दि.---------------

२. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या. मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र हाईल याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :** **सही/----------------------**

**नाव:**

**स्व-हस्ताक्षरातील प्रतिज्ञापत्राचा नमूना**

"I,____________________________(Name of the candidate), hereby declare that all the information submitted by me in the application form is correct, true and valid. I will present the supporting documents as and when required."

"मी---------------------------------(उमेदवाराचे नाव),------------------------------याव्दारे घोषित करतो की, मी अर्जामध्ये सादर केलेली सर्व माहिती योग्य, सत्य आणि वैध आहे. मी सदरची कागदपत्रे आवश्यक असेल तेव्हा सादर करीन."

**अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी**

उपरोक्त लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन व स्व:घोषणा प्रतिज्ञापत्र उमेदवाराने स्वत:च्या हस्ताक्षरात लिहून त्याची स्कॅन प्रत अपलोड करणे आवश्यक आहे. प्रतिज्ञापत्र टंकलिखित केलेले, दुसऱ्या व्यक्तीने अथवा अन्य भाषेत लिहिलेले, आढळून आल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल. (लिहू न शकणाऱ्या अंध अथवा अल्प दृष्टी उमेदवारांनी टंकलिखित प्रतिज्ञापत्रावर स्वत:च्या डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा उमटवून सदरच्या प्रतिज्ञापत्राची प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.)

(इ) **स्व-हस्ताक्षरातील प्रतिज्ञापत्र -** उमेदवाराने त्याच्या स्व-हस्ताक्षरातील उपरोक्त दोन्ही प्रतिज्ञापत्र (१० सेमी X ५ सेमी पांढऱ्या कागदावर काळया/निळया शाई मध्ये लिहीलेले) एकाच कागदावर अपलोड करणे आवश्यक आहे.

**आकारमान** - 800 X 400 pixels in 200 DPI

**फाईल साईज** - 50 kb - 100 kb

**९. परीक्षेचे शुल्क :**

१. सर्व संवर्गातील उमेदवार: रु. ९५०/-

२. दिव्यांग उमेदवार: रु. ८५०/-

३.परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.

४.उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

५.विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित परीक्षेसाठी विचार केला जाणार नाही.

**१०. जिल्हा/ परीक्षा केंद्र निवड:** जिल्हा/ परीक्षा केंद्र बदलाबाबतची विनंती कोणत्याही परीस्थितीत अथवा कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही. एखादे जिल्हा/ परीक्षा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा/ परीक्षा केंद्रावर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हा/ परीक्षा केंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था दुसऱ्या जिल्हा/ परीक्षा केंद्रावर करण्यात येईल.

**११. अर्ज सादर करण्याची प्रक्रिया व कालावधी :-**

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक | https://www.mscepune.in |
| २ | **पूर्वी सन २०२३ मध्ये ऑनलाईन आवेदनपत्र भरलेल्या उमेदवारांसाठी** शासन निर्णयानुसार ऑनलाईन आवेदनपत्रामध्ये दुरस्तीसाठीचा कालावधी. | दि. ०८/१०/२०२५ ते दि. १८/१०/२०२५ |
| ३ | **नवीन उमेदवारांसाठी** ऑनलाईन अर्ज सादर करावयाचा कालावधी | दि. २५/१०/२०२५ ते दि. १०/११/२०२५ |
| ४ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक | दि. १०/११/२०२५ रोजी २३:५९ वाजेपर्यंत. |
| ५ | ऑनलाईन परीक्षा दिनांक | दि. ०१/१२/२०२५ ते दि. ०५/१२/२०२५ या कालावधीत (प्रविष्ट उमेदवारांच्या संख्येनुसार व उपलब्ध भौतिक सुविधेनुसार यामध्ये बदल होऊ शकतो) |



Scanned with OKEN Scanner

**१२. सर्वसाधारण :-**

**१२.१** अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वत:चा शालार्थ आयडी अचूकपणे नमूद करणे अनिवार्य आहे.

**१२.२** ऑनलाईन पध्दतीने परीक्षा परिषदेस सादर केलेल्या अर्जाच्या प्रतीसह अर्ज केल्याबाबतची माहिती उमेदवाराने स्वत: आपल्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत जिल्हा परिषदेस कळविणे आवश्यक आहे.

**१२.३** "प्रस्तुत परीक्षे करीता अर्ज विचारात घेण्यास गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचा कोणताही आक्षेप असल्यास तसे गटशिक्षणाधिकारी यांनी अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर ५ दिवसाचे आत परीक्षा परिषदेस कळविणे आवश्यक आहे. तसेच परीक्षेकरीता अर्ज विचारात घेण्यास हरकत नसल्यास परीक्षा परिषदेस तसे कळविण्याची आवश्यकता नाही." असेही उमेदवाराने संबंधित गटशिक्षणाधिकारी यांना कळवावे.

**१२.४** प्रस्तुत परीक्षा ही मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा असून पदोन्नतीसाठी पात्रता परीक्षा (Qualifying Examination) नाही.

**१२.५** परीक्षेच्या निकालाच्या आधारे परीक्षा परिषदेकडून शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची पात्रता सक्षम प्राधिकाऱ्याकडून तपासली जाईल. सदर परीक्षेमधील उमेदवाराच्या कामगिरीच्या (Performance) आधारे नियुक्ती मागण्याचा उमेदवारास कोणताही हक्क असणार नाही.

**१२.६** परीक्षेस अर्ज सादर केल्यानंतर अथवा परीक्षा दिल्यानंतर उमेदवाराने राजीनामा दिल्यास अथवा कोणत्याही कारणास्तव नोकरी सोडल्यास अथवा सक्षम प्राधिकारी यांनी सेवा समाप्त केल्यास अथवा धारणाधिकार न ठेवता संवर्गबाहय पदावर नेमणूक झाल्यास सदर परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.

**१२.७** अर्जामधील नमूद माहितीच्या आधारे जाहिरातीमधील विहित अर्हतेबाबतच्या अटींची पूर्तता करतात असे समजून पात्रता न तपासता उमेदवारांना तात्पुरता प्रवेश दिला जाईल. परंतु परीक्षेपूर्वी अथवा परीक्षेनंतर कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने अर्जात नमूद केलेली माहिती चुकीची वा खोटी असल्याचे अथवा उमेदवार विहित अर्हतेची पूर्तता करीत नसल्याचे आढळल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि त्याबाबतचा परीक्षा परिषदेचा निर्णय अंतिम राहील.

**१२.८** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती/जाहिरात अधिकृत समजण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने वेळोवेळी परीक्षा परिषदेचे संकेतस्थळ पहावे.

**१२.९** सदर जाहिरात परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१२.१०** सदर परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करतांना उमेदवारांना काही अडचण उद्भवल्यास bpvmscepune2023@gmail.com या इमेल वर संपर्क साधता येईल.

**१२.११** कोणत्याही परिस्थितीत उमेदवाराने विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज अचूक भरावे. जाहिरातीत दिलेल्या मुदतीनंतर याविषयी कोणतीही सबब मान्य केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**१३. प्रवेशपत्र :**

**१३.१** परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या उमेदवारांची प्रवेशपत्रे www.mscepune.in संकेतस्थळावर विशिष्ट लिंकव्दारे उपलब्ध करून देण्यात येतील. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करून घेणे व परीक्षेच्यावेळी उमेदवारांनी सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१३.२** परीक्षेच्या वेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा स्मार्टकार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसेन्स या पैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. प्रवेशपत्र व ओळखपत्र या दोन्ही नावामध्ये कोणत्याही स्वरूपाची तफावत असू नये. उमेदवारांच्या नावात बदल

झालेला असल्यास त्यासंबंधित विवाह नोंदणी प्रमाणपत्र, राजपत्राची प्रत अथवा प्रतिज्ञापत्र याची मूळ तसेच छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**१४. परीक्षेस प्रवेश :**

**१४.१** फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशपत्र, ओळखीचा पुरावा व ओळखीच्या पुराव्याची सुस्पष्ट छायांकित प्रत अथवा प्रवेशपत्रावरील सुचनेनुसार परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षाकक्षात प्रवेश देण्यात येईल.

**१४.२** स्मार्ट वॉच, डिजिटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणत्याही वस्तू, कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोट्स, पुस्तके, बॅग्ज, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने/ साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य उमेदवारांनी आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद अथवा परीक्षा केंद्र व्यवस्थापन अथवा परीक्षा आयोजक जबाबदार राहणार नाहीत.

**१५.** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती/जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**१६.** सदर जाहिरात परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१७.** सदर परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करतांना उमेदवारांना काही अडचण उद्भवल्यास bpvmscepune2023@gmail.com या ईमेल वर संपर्क साधता येईल.

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे -०४,

**ठिकाण :** पुणे
**दिनांक:** २९/०९/२०२५